महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई

# माहिती पुस्तिका व प्रवेश अर्ज

## एम.एस्सी. नर्सिंग
## २०२१ - २०२२

परिचर्या शिक्षण संस्था

बाई मोटलीबाई इमारत, सर ज.जी. रुग्णालय आवार, मुंबई -८.

दुरध्वनी क्र.: (०२२) २३७४४६५५

ईमेल: mumbai.ine@gmail.com;

वेबसाईड- www.inemumbai.org

# महत्वाच्या तारखा

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १. | माहिती पुस्तिका व प्रवेश अर्ज वितरण | ७ ऑक्टोंबर २०२१ ते १४ ऑक्टोंबर २०२१ |
| २. | प्रवेश अर्ज सादर करण्याची अंतिम दिनांक | १८ ऑक्टोंबर २०२१ |
| ३. | तात्पूरती गुणवत्ता यादी | २२ ऑक्टोंबर २०२१ |
| ४ | आक्षेपानंतरची गुणवत्ता यादी | २५ ऑक्टोंबर २०२१ |
| ५ | समुपदेशन | २८ ऑक्टोंबर २०२१ |
| ६ | अंतिम निवड यादी | २९ ऑक्टोंबर २०२१ |
| ७ | अभ्यासक्रम आरंभ | ३० ऑक्टोंबर २०२१ |
| प्रवेश अर्ज मिळण्याचे व स्विकारण्याचे ठिकाण | | परिचर्या शिक्षण संस्था, मुंबई |

परिचर्या सेवा.
एम.एस्सी.नर्सिंग (२ वर्षे) या
पदव्युत्तरअभ्यासक्रमाकरिता प्रवेशपध्दती
सन २०२१-२२

सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात परिचर्या शिक्षण संस्था, मुंबई येथे एम.एस्सी.नर्सिंग (२ वर्षे) या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जागांवर प्रवेश करण्यांसाठी कार्यपध्दती प्रसिध्द करण्यांत येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | प्रवेश क्षमता भरावयाच्या जागा | शासकीय प्रवेश प्रक्रियेद्वारे |
|---|---|---|---|
| १ | परिचर्या शिक्षण संस्था, सर ज.जी. रुग्णालय आवार, भायखळा, मुंबई - ८ | २५ | २५ |
| एकूण | | २५ | २५ |

१. सर्वसाधारण :- (१) परिचर्या शिक्षण संस्था, मुंबई येथे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक संलग्नीत असलेल्या एम.एस्सी. नर्सिंग (२ वर्षे) या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जागांवर प्रवेश करण्याकरिता शासनाकडून प्रवेशप्रकिया राबविण्यात येईल.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | प्रवेश क्षमता भरावयाच्या जागा | शासकीय प्रवेश प्रक्रियेद्वारे |
|---|---|---|---|
| १ | परिचर्या शिक्षण संस्था, सर ज.जी. रुग्णालय आवार, भायखळा, मुंबई - ८ | १. कम्युनिटी हेल्थ नर्सिंग - ०५<br>२. मेडिकल सर्जिकल नर्सिंग- ०५<br>३. चाईल्ड हेल्थ नर्सिंग - ०५<br>४. सायकॅट्रिक नर्सिंग - ०५<br>५. ऑब्स्ट्रॅट्रिक्स ॲण्ड गायनॅकॉलॉजीकल नर्सिंग- ०५ | १. कम्युनिटी हेल्थ नर्सिंग- ०५<br>२. मेडिकल सर्जिकल नर्सिंग- ०५<br>३. चाईल्ड हेल्थ नर्सिंग- ०५<br>४. सायकॅट्रिक नर्सिंग- ०५<br>५. ऑब्स्ट्रॅट्रिक्स ॲण्ड गायनॅकॉलॉजीकल नर्सिंग- ०५ |
| एकूण | | २५ | २५ |

वरील तक्त्यामध्ये दर्शविलेली संस्था शासकीय संस्था असून त्यामध्ये सन २०२१-२२ मध्ये सदर अभ्यासक्रमासाठी शासकीय प्रक्रियेद्वारे प्रवेश करण्यांस शासनाचे पत्र क्र. एमईडी १०२१/ प्र.क्र. २६६ /२१/ शिक्षण-२. दिनांक २७ सप्टेंबर २०२१ क्र.संवैशिवसं/एनयुआर मान्यता/प्रवेश २०२१-२२/ई-२/१३२४३ /२०२१ दिनांक. ०१/१०/२०२१ संमती दिलेली आहे.

२. सक्षम प्राधिकारी, प्राधिकृत अधिकारी व त्यांचे कार्य :-

२.१) निवड प्रक्रिया सक्षम अधिकारी व त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांमार्फत राबविली जाईल. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई हे या बाबतीत सक्षम प्राधिकारी असतील व त्यांनी प्राधिकृत केलेले संस्थानिहाय अधिकारी खालीलप्रमाणे आहेत :-

| अ.क्र. | संस्थेचे नाव | प्राधिकृत अधिकारी |
|---|---|---|
| १ | परिचर्या शिक्षण संस्था, मुंबई | प्राचार्या,<br>परिचर्या शिक्षण संस्था,<br>सर ज.जी. रुग्णालय आवार, भायखळा, मुंबई- ४०० ००८ |

२.२) सक्षम प्राधिकारी यांचे कार्य :-

सक्षम प्राधिकारी, त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांमार्फत सदर नियमानुसार प्रवेश प्रक्रिया अंमलात आणतील व निवड प्रक्रियेवर नियंत्रण ठेवतील आणि उमेदवारांनी जर प्रतिवेदन केले तर त्या संदर्भात अपिलीय प्राधिकारी म्हणून काम पाहतील. सक्षम प्राधिकारी या नियमांच्या अंमलबजावणीकरिता आवश्यक त्याबाबतची व्यवस्था करतील. सक्षम प्राधिकाऱ्यांने अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने आपली बाजू मांडण्यास किंवा या संदर्भात न्यायालयांत दाखल होणाऱ्या

याचिकांच्या बाबतीत शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशास अनुसरुन सक्षम प्राधिकाऱ्यांस शासनाच्या वतीने न्यायालयात आपली बाजू मांडण्यांस प्राधिकृत करण्यांत येत आहे.

प्रवेश प्रक्रीये संबंधी सर्व कायदेशीर प्रकरणे मुंबई न्यायाधीकरणाच्या कार्यकक्षेतच पार पाडल्या जातील.

२.३) प्राधिकृत अधिकारी यांचे कार्य :-

प्राधिकृत अधिकारी सक्षम प्राधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली आवेदन पत्रे वितरीत करणे, उमेदवारांनी भरलेली आवेदन पत्रे स्विकारणे व त्यांची छाननी करणे आणि गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे ही कामे करतील. प्राधिकृत अधिकारी यांना त्यांच्या निवड आदेशासंबंधीच्या निर्णयास न्यायालयात आव्हान देण्यांत आल्यास, त्या बाबतीत तसेच सक्षम अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार राज्य शासनाच्या व/किंवा सक्षम प्राधिकारी यांच्या वतीने न्यायालयांत आपली बाजू मांडण्याकरीता प्राधिकृत करण्यांत येत आहे.

२.४) प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवाराने विहित नमुन्यांतील फक्त एकाच शैक्षणिक अभ्यासक्रमाकरीता एकच अर्ज सादर करावा. उमेदवाराने एका पेक्षा जास्त शैक्षणिक अभ्यासक्रमास अर्ज सादर केल्यास त्यांच्या अर्जाचा कोणत्याही अभ्यासक्रमाकरीता विचार केला जाणार नाही.

२.५) विहित नमुना अर्ज प्राधिकृत अधिकाऱ्यांमार्फत मिळू शकतील. सर्व दृष्टीने पूर्णतः भरलेले अर्ज सक्षम प्राधिकारी यांनी अधिसूचित केलेल्या दिनांकास अथवा तत्पूर्वी प्राधिकृत अधिकाऱ्यांना सादर करावेत. उशिरा आलेले अर्ज नाकारण्यांत येतील. सामायिक गुणवत्ता यादी प्राचार्या, परिचर्या शिक्षण संस्था, सर ज. जी. रुग्णालय आवार, भायखळा, मुंबई यांच्या कार्यालयांतील सूचना फलकांवर लावण्यांत येईल.

(२.६) तक्रार निवारण प्राधीकारी (सर्व साधारण): अधिनियमाच्या कलम ९ अन्वये प्रवेश प्रक्रियेबाबत कोणतीही तक्रार असल्यास, सक्षम प्राधिकरी /प्राधिकृत अधिकारी यांच्याव्दारे कार्यवाही केली जाईल.

३. पात्रता व अर्हता :-

३.१) फक्त भारतीय नागरिकत्व असलेले उमेदवारच प्रवेशांस पात्र असतील.
(राष्ट्रीयत्वाचा दाखला जोडणे आवश्यक आहे.)

३.२) ३० सप्टेंबर २०२१ या दिनांकास खुल्या गटातील उमेदवारांसाठी ४५ वर्षे व मागासवर्गीय गटांतील उमेदवारांसाठी ५० वर्षे ही कमाल वयोमर्यादा राहील.

४. अर्हता परीक्षा कार्यानुभव :-

४.१) उमेदवाराने महाराष्ट्र राज्य माध्यमिक परीक्षा मंडळाची उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा किंवा महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त तत्सम परीक्षा इंग्रजी विषयांसह उत्तीर्ण केलेली केलेली असावी.

४.२) ज्या उमेदवारांचे पालक महाराष्ट्र राज्यातील मूळ रहिवासी असतील, परंतू उमेदवार माध्यमिक शालांत वा तत्सम आणि/किंवा उच्च माध्यमिक शालांत परीक्षा महाराष्ट्र राज्याबाहेरील संस्थेतून उत्तीर्ण झाला असेल तर असाही उमेदवार प्रवेशासाठी पात्र असेल, मात्र अशा उमेदवारांनी जिल्हादंडाधिकारी अथवा महानगर दंडाधिकारी यांच्या सहीचे मूळ वास्तव्य प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४.३) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. तसेच त्याने भारतीय परिचर्या परिषद व महाराष्ट्र परिचर्या परिषद यांच्या मान्यता प्राप्त संस्थेतून / अभ्यासकेंद्रातून बेसिक बी.एस्सी नर्सिंग /पी.बी.बी.एस्सी नर्सिंग /पी.बी.बी.एस्सी.(इग्नु) नर्सिंग अभ्यासक्रमाची परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

४.४) उमेदवार हा नर्स आणि मिडवाईफ म्हणून महाराष्ट्र परिचर्या परिषदेकडे नोंदणीकृत असणे

अनिवार्य आहे. तसेच सदर नोंदणीचे २०२२ पर्यंतचे नुतनीकरण केलेले असावे.

४.५) उमेदवाराने नर्स आणि मिडवाईफ म्हणून महाराष्ट्र परिचर्या परिषदेकडे नोंदणीकृत केल्यानंतर एक वर्षाचा कार्यानुभव असणे अनिवार्य आहे.

४.६) शासन सेवेतील उमेदवारांनी पाच वर्षे शासन सेवा अखंडीत पूर्ण केलेली असली पाहिजे. उमेदवाराने या कार्यानुभवासंबंधीचे प्राधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४.७) सेवांतर्गत उमेदवारांनी त्यांचे अर्ज योग्य यंत्रणे मार्फत सादर करावेत. योग्य यंत्रणे मार्फत विहीत वेळेत प्राप्त झालेल्या अर्जानुसार गुणवत्ता यादी तयार केली जाईल. उशिराने प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच उशिराने पोस्टाद्वारे आलेल्या झेरॉक्स किंवा आगाऊ अर्जाच्या प्रती स्विकारल्या जाणार नाहीत. याची नोंद घेण्यांत यावी.

५. शारीरीकदृष्टया पात्र असल्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र :-

हा अभ्यासक्रम पूर्ण करण्यांसाठी उमेदवार शारीरिक व मानसिकदृष्टया सक्षम असला पाहिजे. उमेदवारांनी शारीरिकदृष्टया सक्षम असल्याबाबतचे शासकीय रुग्णालयाच्या जिल्हा शल्य चिकीत्सक/वैद्यकीय अधिक्षक यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावे. तसेच अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, १९९५ च्या कलम २ (टी) नुसार, सदर आरक्षणासाठी अपंग उमेदवाराचे अपंगत्व किमान ४० टक्के असणे आवश्यक आहे. प्रवेश घेतल्यानंतर जर संबंधीत उमेदवार शारीरिक आणि/अथवा मानसिकदृष्टया सक्षम नाही असे आढळून आल्यास अशा उमेदवारांचा प्रवेश रद्द करण्यांत येईल.

६.आरक्षण :-

६.१) मागासवर्गीय उमेदवारांसाठी आरक्षण -

६.१.१) मागासवर्गीय उमेदवारांसाठी खाली दर्शविल्यानुसार आरक्षण असेलः

| अ.क्र. | प्रवर्ग | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती व बौध्द धर्मांतरीत अनुसूचित जाती (अ.जा.) | १३.० |
| २ | अनुसूचित जमाती (निर्देशित क्षेत्रांच्या बाहेर राहणाऱ्यांस (अ.ज.) | ७.० |
| ३ | निरधिसूचित जमाती (अ) विमुक्त जाती) वि.जा. (अ) | ३.० |
| ४ | भटक्या जमाती - (ब) भ.ज. (ब) | २.५ |
| ५ | भटक्या जमाती - (क) भ.ज. (क) | ३.५ |
| ६ | भटक्या जमाती - (ड) भ.ज. (ड) | २.० |
| ७ | इतर मागासवर्गीय (इ.मा.व.) | १९.० |

टीपः- विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांचा इतर मागासवर्ग प्रवर्गातुन विचार करण्यांत येईल.

६.१.२) वर नमूद केलेल्या (१) ते (७) मागासवर्गीय प्रवर्गासाठी अर्जदारांनी सक्षम प्राधिकाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र प्रवेश अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

६.१.३) वरील (३) ते (७) या प्रवर्गातील प्रगत व उन्नत गटात मोडणाऱ्या उमेदवारांना आरक्षणाचे लाभ अनुज्ञेय असणार नाहीत. तथापि, या प्रवर्गातील उमेदवार जे प्रगत व उन्नत गटात मोडत नाहीत, (Non Creamy Layer Certificate) अशा उमेदवारांनी शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य क्र.सीबीसी.१०/२००८/प्र.क्र.६९७/मावक, दि. १३ जानेवारी २००९ शी संलग्न असलेल्या प्रमाणपत्राच्या सुधारित नमुन्यात ते प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.जुन्या वर्षांचे (Non Creamy Layer Certificate) प्रमाणपत्र सादर केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.

६.१.४) उपरोक्त (१) ते (७) या मागासवर्गीय प्रवर्गातील जागा रिक्त राहिल्यास मागासवर्गीयांच्या

उर्वरित प्रवर्गातील अर्जातून त्यांच्या आंतरगटानुसार भरण्यांत येतील व त्यानंतरही रिक्त राहणाऱ्या जागा खुल्या गटातील उमेदवारांतून गुणवत्तेनुसार भरण्यांत येतील.

६.१.५) आरक्षणाबाबत आंतरगट खालीलप्रमाणे राहतील :-

गट १.

अ) अ.जा.व बौध्द धर्मांतरीत राहतील (ब) अ.ज.(निर्देशित क्षेत्राच्या बाहेर राहणाऱ्यांसह)

गट २.

(अ) वि.जा. - अ (ब) भ.ज. - ब

गट ३.

(अ) भ.ज. - क (ब) भ.ज. - ड (क) इ.मा.व.

६.१.६) आरक्षण प्रवर्गाच्या जागा विचारात घेतांना ज्या मागासवर्गीय उमेदवारांची निवड गुणवत्तेनुसार (आरक्षणाचा लाभ न घेता) झालेली आहे, अशा उमेदवारांची गणना आरक्षीत जागांमध्ये केली जाणार नाही.

६.२) अपंग उमेदवारांसाठी खाली दर्शविल्यानुसार आरक्षण असेल :-

६.२.१) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांच्या सुधारीत अधिसुचना क्र एफ-१-५/२०१८ - आय.एन.सी दिनांक १०/०४/२०१९ च्या तरतुदींनुसार एकूण जागांपैकी ५ टक्के जागा अपंग उमेदवारांसाठी आरक्षित असतील.या जागांवर उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या खुल्या प्रवर्गातील उमेदवारांमधून भरण्यांत येतील. शासन निर्णय क्र.एम.ई.एस.-१२०२-(८१)/वैसेवा-१,मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

६.२.२) अपंगांसाठी राखीव असलेल्या जागांकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवाराने त्यांच्या अपंगत्वाबद्दल जिल्हा सामान्य रुग्णालयांतील जिल्हा शल्यचिकीत्सक/वैद्यकीय मंडळ / शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक अथवा संचालक, ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ फिजीकल मेडिसीन ॲण्ड रिहॅबिलीटेशन, हाजी अली, मुंबई यांचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रमाणपत्रांची प्रमाणित सत्यप्रत उमेदवारांनी आपल्या अर्जासोबत जोडावी.

प्रवेशासाठी ४० टक्के अपंगत्व असणे आवश्यक आहे. ५० टक्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेले उमेदवार एम. एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमाच्या प्रवेशास पात्र नाहीत. हालचाल अक्षमता (Locomotor Disability) वगळता इतर अपंगत्वास नियमानुसार परवानगी नाही.

तथापि, उमेदवारांच्या अपंगत्वाची पडताळणी, याकरिता सक्षम प्राधिकारी यांनी स्थापन केलेल्या वैद्यकीय मंडळामार्फत करण्यांत येईल.

६.३) अनाथ उमेदवारांसाठी खाली दर्शविल्यानुसार आरक्षण असेल -

शासन निर्णय दि. २.४.२०१८ अन्वये अनाथ उमेदवाराना शिक्षण व नोकरीमध्ये खुल्या प्रवर्गातून १ टक्का समांतर आरक्षण लागू करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने सदर उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील १ टक्का संमातर आरक्षण लागू राहिल त्याकरिता त्यांनी महिला व बालविकास विभागाचे प्रमाणपत्र सादर करावे.

७. निवड प्रक्रियेसाठी ग्राहय धरावयाची गुणवत्ता :-

उमेदवार उत्तीर्ण झालेल्या बेसिक बी.एस्सी नर्सिंग /पी.बी.बी.एस्सी. नर्सिंग विषयातील अभ्यासक्रम परीक्षेच्या सर्व वर्षाच्या परीक्षेतील एकुण गुणांच्या आधारे त्यांची निवड करण्यांत येईल. निवड करतांना उमेदवारांना समान गुण मिळत असतील तर त्यांचेबाबत आंतर गुणवत्ता ठरविण्यासाठी पुढील पध्दती अवलंबविण्यात येईल. :-

७.१) प्रथम प्राध्यान्यक्रम ठरवितांना उमेदवारास बेसिक बी.एस्सी./पी.बी.बी.एस्सी. नर्सिंग परीक्षेमध्ये

मिळालेले एकूण गुण यावर आधारीत असेल.
७.२) दुसरा प्राधान्यक्रम ठरवितांना उमेदवारांस उच्च माध्यामिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेत (इयत्ता १२ वी) मिळालेले एकूण गुण ग्राहय धरले जातील. .
७.३) तिसरा प्राधान्यक्रम ठरवितांना उमेदवारास इयत्ता १० वी परीक्षेत मिळालेले एकूण गुण ग्राहय धरले जातील.

८. निवड प्रक्रिया :-

८.१) पात्रता व अर्हता अन्वये पात्र असलेल्या उमेदवारांची तात्पुरती गुणवत्ता यादी प्राचार्या, परिचर्या शिक्षण संस्था, मुंबई यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर प्रदर्शित केली जाईल. त्यानंतर संबंधितांकडून काही आक्षेप असल्यास २ (दोन) दिवसांच्या मुदतीत ते विचारात घेऊन अंतिम गुणवत्ता यादी (आवश्यकता असल्यास दुरुस्त्यांसह) वर निर्दिष्ट केलेल्या ठिकाणी प्रकाशित केली जाईल.
८.२) गुणवत्ता यादीनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांनी सर्व मुळ कागदपत्रांसह दिलेल्या दिनांकास समुपदेशनासाठी प्राचार्या, परिचर्या शिक्षण संस्था, मुंबई येथे उपस्थित रहावे.
८.३) समुपदेशन प्रक्रियेमध्ये गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांची अंतिम निवड यादी वर निर्दिष्ट केलेल्या ठिकाणी प्रकाशित केली जाईल. सदर उमेदवारांना निवड आदेश संस्थेमधुन वितरीत करण्यात येतील. पंधरा दिवसाच्या आत जे उमेदवार संस्थेत दाखल होणार नाहीत, त्यांचा निवड झालेल्या जागेवर प्रवेश मिळण्याकरिता कोणताही हक्क राहणार नाही. उमेदवार विहीत मुदतीत संस्थेत दाखल न झाल्यामुळे रिक्त राहणाऱ्या जागा ज्या कोटयातील असतील त्यानुसार प्रतिक्षा यादीतुन भरल्या जातील व तरीही जागा रिक्त राहील्यास प्रतिक्षा यादीतुन उमेदवार शिल्लक असतील त्यांची गुणवत्तेनुसार निवड केली जाईल.
८.४) प्रवेश घेतांना उमेदवारांनी मूळ कागदपत्रे संबंधित संस्थेच्या प्राचार्याकडे त्वरित सादर करणे आवश्यक आहे. तसेच विहीत शुल्काचा भरणाही तेव्हाच करणे आवश्यक राहील.
८.५) संबंधीत संस्थेत कोणत्याही कारणास्तव रिक्त होणारी जागा प्रतिक्षा यादीतील उमेदवारांमधूनच भरण्यांत येईल. उपलब्ध जागा त्या गटांतील उमेदवारां अभावी रिक्त राहिल्यास दुसऱ्या गटांतील उमेदवारांस त्यांच्या आंतरगटानुसार प्रतिक्षा यादीमधून भरण्यांत येईल.
८.६) एखाद्या उमेदवाराने निर्धारित शुल्क भरलेले असूनही तो प्रथम सत्र सुरु झाल्यापासून १५ दिवसांचे आत प्रशिक्षणांस उपस्थित राहीला नाही तर त्याचा प्रवेश रद्द करण्याचे अधिकार संबंधीत संस्थेच्या प्राचार्यांना राहील व अशा परिस्थितीत उमेदवारास भरलेल्या शुल्काचा परतावा मिळणार नाही.
८.७) निवड झालेल्या उमेदवाराचा अंतिम प्रवेश महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक यांच्या मान्यतेवर अवलंबून राहील.

८.८) याव्दारे असे स्पष्ट करण्यात येते की, जे उमेदवार निवड झाल्यानंतर संस्थेमध्ये हजर होणार नाहीत किंवा विहित वेळेत आवश्यक औपचारिकतांचे पालन करण्यास अयशस्वी ठरतील असे सर्व उमेदवार पुढील दोन वर्षाकरीता प्रवेश घेण्यास अपात्र ठरतील आणि विद्यापीठाच्या कट ऑफ दिनांकानंतर प्रवेश रद्द केल्यास तसेच सदर अभ्यासक्रम चार वर्षात पूर्ण न केल्यास रक्कम रु. १,५०,०००/- (एक लाख पन्नास हजार) फक्त - लॅप्स ऑफ सीट दंड म्हणून भरावा लागेल.
८.९) प्रवेश प्रक्रीये संबंधी सर्व कायदेशीर प्रकरणे मुंबई न्यायाधीकरणाच्या कार्यकक्षेतच पार पाडल्या जातील.

९. सेवाअंतर्गत शासकीय उमेदवारांसाठी :-

महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम, १९८१ प्रकरण सात -अध्ययन रजा (८० ते ९३) अन्वये-
९.१) सेवांतर्गत उमेदवारांना म.ना.से. रजा नियम, १९८१ मधील अध्ययन रजा नियम ८० ते ९३

मधील तरतुदी नुसार अध्ययन रजेबाबत कार्यवाही केली जाईल.

९.२) ज्या सेवांतर्गत उमेदवारांनी यापूर्वी प्रतिनियुक्ती/अध्ययन रजेचा लाभ घेतलेला आहे, अशा सेवांतर्गत उमेदवारांना म.ना.से. रजा नियम, १९८१ मधील अध्ययन रजा नियम ८० ते ९३ मधील तरतुदी नुसार अध्ययन रजा मंजूर करता येणार नाही.

९.३) अध्ययन रजेबाबत सर्व अधिकार व अंतिम निर्णय हा शासनाचा असेल.

९.४) प्रवेशासाठी निवड झालेल्या सेवांतर्गत उमेदवारांस ५ वर्षे शासकीय सेवा करण्याचे बंधपत्र मुळ संस्थेत विहित नमुन्यात द्यावे लागेल. जर उमेदवाराने अभ्यासक्रमानंतर शासन सेवेतील ५ वर्षे शासन सेवा केली नाही. तर प्रशिक्षण काळात अदा करण्यात आलेले वेतन व भत्यांची रक्कम शासन नियमानुसार एक रकमी वसूल करण्यांत येईल. तसेच सदरहू अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची वैद्यकिय संचालनालयाच्या अधिपत्याखाली असलेल्या इतर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांत बदली/नियुक्ती केल्यास तेथे हजर होणे बंधनकारक राहील.

१०. प्रवेशअर्ज व कागदपत्रे :-

१०.१) सर्व अर्जदारांनी पुढील कागदपत्रांच्या साक्षांकीत सत्यप्रती प्रवेश अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१) उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा १२वी (१०+२) अथवा तत्सम समकक्ष परीक्षेची गुणपत्रिका व प्रमाणपत्र

२) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र व गुणपत्रिका.

३) महाराष्ट्र परिचर्या परिषद नोदणी व नुतनीकरण प्रमाणपत्र

४) बेसिक बी.एस्सी./पी.बी.बी.एस्सी.नर्सिंग परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र व प्रत्येक वर्षाच्या सर्व गुणपत्रिका.

५) बेसिक बी.एस्सी./पी.बी.बी.एस्सी.नर्सिंग महाविद्यालय सोडल्याचा दाखला

६) ज्या उमेदवारांनी माध्यमिक शालांत वा उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा इतर राज्यातून उत्तीर्ण केली असेल, परंतू जे महाराष्ट्र राज्याचे मूळ रहिवासी असतील त्यांचे बाबतीत सक्षम अधिकाऱ्याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

७) राष्ट्रीयता प्रमाणपत्र (Nationality Certificate)

८) शारीरिक क्षमता प्रमाणपत्र (Medical Fitness Certificate)

९) स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) (म.आ.वि.वि. व्यतिरिक्त उमेदवारांकरिता)

१०) जात प्रमाणपत्र (मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत)

११) जात पडताळणी प्रमाणपत्र (मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत)

१२) उन्नत व प्रगत गटात समाविष्ट होत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (Non Creamy Layer Certificate) (अनूसुचित जाती व अनुसूचित जमाती या प्रवर्गाखेरीज अन्य मागासवर्गीय प्रवर्गातील आरक्षित जागांकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवारांसाठी) ३१मार्च २०२२ पर्यत वैद्य असलेले

१३) अनुभव प्रमाणपत्र (Experience Certificate

१४) प्रयत्न प्रमाणपत्र बेसिक बीएसी/ पी.बी.बी.एसी नर्सिग/ पी.बी.बी.एसी नर्सिग (इग्नू) (Attmpt Certificate)

१५) शासकीय उमेदवाराकरिता ना हरकत प्रमाणपत्र.

१०.२) खालील बाबींची पूर्तता केल्याशिवाय प्रवेश अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत :-

१०.२.१) प्रवेश अर्ज योग्यरित्या व अचूक भरलेले असावेत.

१०.२.२) प्रवेश अर्जात केलेल्या दाव्याच्या पृष्ठयर्थ आवश्यक प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत सत्यप्रती जोडलेल्या असाव्यात.

१०.२.३) प्रवेश अर्ज अंतिम निर्धारित दिनांक व वेळेत संबंधीत प्राधिकाऱ्यांच्या कार्यालयांस प्राप्त झाले पाहिजे.

१०.२.४) प्रवेश अर्जासोबत सर्व आवश्यक प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत सत्यप्रती जोडलेल्या नसतील तर अशा कोणत्याही प्रवेश अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१०.२.५) प्रवेशाच्या वेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्याकडे सुपूर्द करण्यांत येतील. ही मूळ प्रमाणपत्रे अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर किंवा संस्था सोडून जातांना उमेदवारांस परत करण्यांत येतील.

१०.२.६) प्रवेश अर्ज सादर केल्यावर कोणत्याही कारणास्तव प्रमाणपत्राच्या सत्यप्रती नंतर सादर केल्यास त्या स्विकारण्यांत येणार नाहीत. उमेदवाराने प्रवेश अर्ज नीट काळजीपूर्वक भरावा. अर्जामध्ये जर उमेदवाराने जाणीवपूर्वक खोटी माहिती दिली आहे, असे आढळून आल्यास त्याला दिलेला प्रवेश तात्काळ रद्द केला जाईल व त्याने भरलेले शुल्क परत केले जाणार नाही, तसेच सदरहू अभ्यासक्रमास असा उमेदवार अपात्र ठरविला जाईल.

१०.२.७) शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवाराने त्यांचे अर्ज मुळ संस्थेकडे सादर करावेत. सदर संस्थेने अर्ज संचालनालयाला विहीत वेळेत सादर करणे आवश्यक राहील. संचालनालयाने शिफारशींसह संबंधीत प्राधिकृत अधिकारी यांच्याकडे विहित मुदतीत सादर करावेत. योग्य यंत्रणे मार्फत न आलेल्या अर्जांचा प्रवेशाकरिता विचार केला जाणार नाही.

## ११. शुल्क व शिष्यवृत्ती इत्यादी :-

११.१) या अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक शुल्क हे महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या दरानुसार राहील.

११.२) वसतीगृहाची सुविधा उपलब्ध असणाऱ्या जागांवर अवलंबून राहील. मात्र सर्व उमेदवारांना वसतीगृहाची सोय उपलब्ध होईलच असे नाही.

११.३) निवड झालेल्या उमेदवारांना प्रथम सत्राचे अभ्यासक्रम शुल्क प्रवेशाच्या वेळीच भरावे लागेल. त्यानंतर प्रत्येक सत्राच्या प्रारंभी निर्धारित शुल्क भरावे लागेल. प्रवेश शुल्क भरल्यानंतरच विद्यार्थ्याचा प्रवेश ग्राहय धरला जाईल.

११.४) शासन निर्णय क्र.एएमसी-१००७/६२८/प्र.क्र.१४८/०७/शिक्षण-२ दि.०१ मार्च २०११ नुसार शैक्षणिक शुल्क विवरणपत्र

| अ.क्र. | तपशिल | शुल्क |
|---|---|---|
| १ | प्रवेश शुल्क | रु. १५०० |
| २ | पाठय शुल्क(प्रत्येक वर्षासाठी) | रु.१५,८०० |
| ३ | ग्रंथालय अनामत (परतावा योग्य) | रु. २००० |
| ४ | वसतीगृह भाडे(वार्षिक) | रु. ४००० |
| ५ | जिमखाना/कल्चरल शुल्क (वार्षिक) | रु.५०० |
| ६ | ग्रंथालय शुल्क (वार्षिक) | रु.१००० |
| ७ | संकिर्ण(वार्षिक) | रु.१००० |

वरील शुल्कांखेरीज विद्यापीठ परीक्षा व इतर शुल्क विद्यापीठ नियमानुसार घेतले जाईल.

११.५) शैक्षणिक शुल्क माफीच्या योजना जसे की, मागासवर्गीय उमेदवारांना शैक्षणिक शुल्क माफीची योजना, आजी-माजी सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक शुल्क माफीची योजना, प्राथमिक/माध्यमिक शाळांच्या शिक्षकांच्या पाल्यांना शैक्षणिक शुल्क माफीची योजना इत्यादी शासनाच्या वेळोवेळी अंमलात

असणाऱ्या आदेशानुसार संबंधीतांना अनुज्ञेय राहतील.

१२. निवड झाल्यानंतर उमेदवाराने पालन करावयाची वर्तणूक व शिस्त

१२.१) निवड झालेल्या उमेदवाराने विहित केलेले शैक्षणिक शुल्क वेळेत भरणे अनिवार्य आहे.

१२.२) निवड झालेल्या उमेदवाराने प्रवेशाच्या वेळी उक्त नमुद मुळ कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे. तसेच खंड बंधपत्र, ल्यॅपस ऑफ सीट बंधपत्र व शंभर टक्के हजेरीचे बंधपत्र असे तीन वेगवेगळे बंधपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१२.३) प्रवेशित विध्यार्थ्यांना संस्थेचे व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे वर्तणूक व शिस्त या संबंधीचे नियम बंधनकारक असतील.

१२.४) शासनाचे वेळोवेळी अंमलात असलेले कायदे व नियम यांतील तरतुदींच्या विरुध्द कोणताही विद्यार्थी राष्ट्रविरोधी कृत्यात सहभागी आहे, असे आढळल्यास प्राचार्या पूर्वसूचनेशिवाय त्या विद्यार्थ्यास संस्थेतून काढून टाकू शकतील.

१२.५) निवड झालेल्या उमेदवारांनी शैक्षणिक सत्रामध्ये गैरहजर राहता कामा नये. सर्व गैरहजर राहणाऱ्या उमेदवारांवर नियमानुसार कार्यवाही केली जाईल .तथापि, शासकीय सेवेतील गैरहजर उमेदवारांच्या बाबतीत संस्थेकडून संबंधीत कार्यालयांस लेखी अहवाल पाठविला जाईल.

१२.६) प्रवेश अर्जातील कोणतेही विधान वा उमेदवाराने दिलेली माहिति ही नंतर केव्हाही खोटी/चुकीची आहे असे आढळून आल्यास त्याचा प्रवेश रद्द केला जाईल. त्याने भरलेले शुल्क जप्त केले जाईल व त्यास प्राचार्या महाविद्यालयातून काढून टाकु शकतील आणि त्यांचेवर शासकीय नियमानूसार कारवाई करण्यांत येईल.

१२.७) प्रवेशासाठी येणारा विद्यार्थी यापूर्वी रॅगिंग करण्यांमध्ये गुंतलेला असेल तर त्याला प्रवेश नाकारण्यांत येईल किंवा प्रवेश दिल्यानंतरही असे निदर्शनास आले की, सदर विद्यार्थी रॅगिंग करण्यामध्ये गुंतलेला होता, तर त्याला निष्कासित करण्यांत येईल.

१२.८) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या नियमाप्रमाणे विद्यार्थ्यास सदर पदव्युत्तर अभ्यासक्रम ४ वर्षात पूर्ण करणे बंधनकारक राहील.

एम.एस्सी.नर्सिंग अभ्यासक्रम (२ वर्षे) जागा वाटपाचे विवरणपत्र

| अक्र. | संस्थेचे नाव | एकूण जागा | शासकीय कोटयातील जागा | अ. जा. | अ. ज. | वि. जा. (अ) | भ. ज. (ब) | भ. ज. (क) | भ. ज. (ड) | इ. मा. व. | एकूण आरक्षित जागा | एकूण खुल्या जागा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | परिचर्या शिक्षण संस्था, सर ज.जी.समूह रुग्णालय आवार, भायखळा, मुंबई | २५ | २५ डिएमईआर-१० , डिएचएस-१०, खाजगी-०५) | ४ | २ | १ | ० | १ | ० | ५ | १३ | १०+१ अपंग +१ अनाथ |
| | | एकूण | २५ | ४ | २ | १ | ० | १ | ० | ५ | १३ | १२ |

टिप :- अपंग व्यक्तींसाठी एकूण जागांपैकी ५ टक्के आरक्षित जागा.

अनाथ व्यक्तींसाठी एकूण खुल्या जागांपैकी १ टक्का समांतर आरक्षण.

**Annexure** "A"

**CERTIFICATE OF MEDICAL FITNESS**

This is to certify I have conducted clinical examination of Smt/Mr. ………………
……………………………………………………………………………………… who is desirous of admission to Nursing Courses.

He/she has not given any personal history of any disease incapacitating him/her to undergo the professional course. Also, on clinical examination it has been found that he/she is medically fit to undergo the Nursing course.

(1) Absence of any incapacitating and /or progressive systematic disease/disorder/condition.
(2) Absence of any disability of upper limb/s,
(3) Absence of any major visual/auditory disability,
(4) Absence of psychosis/neurosis/mental retardation.
(5) Ability to maintain erect posture.
(6) Reasonable manual dexterity.

| | |
|---|---|
| Address of the Registered Medical Practitioner<br><br><br>Date | Signature |
| | Name |
| | Registration No. |
| | Seal of Registered Medical Practitioner |

**Note:** A candidate must be medically fit to undergo the Nursing Courses applied for. The medical fitness must be certified by a Registered Medical Practitioner in the prescribed Proforma, as given above on a Letterhead.

**Annexure** "B"

**PERSONS WITH DISABILITY (PWD)RESERVATION**

**PROFORMA OF CERTIFICATE FOR PERSONS WITH DISABILITY (PWD) CANDIDATE**
**CERTIFICATE OF LOCOMOTOR DISABILITY**

Certificate No. ……………………………. Dated………………………
This is to certify that Mr./Ms, ………………………………………………………

Aged ………years Son / daughter of Mr. ……………………………………………
R / o……………………………………………………………………………..
is suffering from ……………………………………………………….. (Name of the Disease) And has Permanent Physical Impairment (PPI) of Left / Right / Both Lower Limb. He / She is Locomotor disabled and has the percentage of …………… (in words ) ……………………………………….. (in figure) of (40% - 50%) disability of lower limbs.

He / She is eligible / NOT eligible for admission in Medical / Dental/Nursing Courses as per the INC guideline subject of his being otherwise Medically Fit.

Candidate Name

Category :

E-mail :

Mobile No. :

Sign.& Name ------------ Sign. & Name ---------------- Sign. & Name -----------

**(Specialist, Dept. PMR)** **(Specialist, Dept.Ortho.)** **( Specialist, Dept.PMR/Ortho)**

## SCRUTINY FORM FOR M.Sc. NURSING

Application Form No. : - .........................................................…………………….

Scrutiny Centre : -.......................................................…………………....

Name of the Candidate : - ........................................................…………………..

Category : - …………………Mobile No. -………………….…………

**Signature of Candidate**

Arrange the set of original certificates and one set of attested photo copies separately in the order given below for verification: -

| Sr. No. | Certificates | Yes | No | Remark |
|---|---|---|---|---|
| 1 | HSC Passing Certificate and Mark Sheet | | | |
| 2 | SSC Passing Certificate and Mark Sheet | | | |
| 3 | Registration Certificate of MNC with recent renewal date | | | |
| 4 | Degree Certificate | | | |
| 5 | Basic B.Sc.(N)/P.B.B.Sc.(N)/IGNOU Mark Sheets & Certificate | | | |
| 6 | Basic B.Sc.(N)/P.B.B.Sc.(N)/IGNOU College Leaving Certificate | | | |
| 7 | Domicile Certificate | | | |
| 8 | Nationality Certificate | | | |
| 9 | Medical Fitness Certificate (As per Annexure ‘A’) | | | |
| 10 | Migration Certificate (Other than MUHS) | | | |
| 11 | Caste Certificate | | | |
| 12 | Caste Validity Certificate | | | |
| 13 | Non-Creamy Layer Certificate for VJ, NT-1, NT-2, NT-3, OBC & SBC (Valid up to 31/03/2022 or more) | | | |
| 14 | Experience Certificate | | | |
| 15 | No Objection Certificate for Government Candidate | | | |
| 16 | Specified reservation Person with Disability Certificate | | | |
| 17 | Affidavit for Full Attendance (after admission) | | | |
| 18 | Affidavit (GAP Certificate - after admission) | | | |
| 19 | Bond for Laps of Seat (after admission) | | | |
| 20 | Attempt Certificate | | | |
| 21 | Gazzete for Name change | | | |

**Remarks**

**Eligible** **Yes/ No**

**If No, reasons** (specifications)

……………………………………………………………………….............................................

..........................................................................................................................................

…………………………………………………………………………………………………

.

**I-Scrutiny Officer** **II-Scrutiny Officer** **III- Scrutiny Officer**

**Signature of the Principal** **Official Stamp**

**Government of Maharashtra**
**Directorate of Medical Education & Research**
**INSTITUTE OF NURSING EDUCATION**
Bai Motalibai Bldg., Sir J.J. Groups of Hospital Campus, Byculla, Mumb

## Application Form for M. Sc. Nursing 2021-2022

Paste a 3.5 cm x 4.5 cm Size recent Photograph only

**Application Form No.**

**Instruction:**

i. *Write with a Black/Blue ball point Pen*
ii. *Write in capital letters.*
iii. *Please Tick (√) Appropriate Block*
iv. *Do not attach any Original certificates with this Application form.*

**Last Name** :

**First Name** :

**Middle Name** :

**Mothers Name** :

**Gender** :

**Date of Birth** :

**Age (in Years)** :

**Nationality** :

**Domicile** :

**Religion & Caste** :

**Category** :

**Mobile No**

**Correspondence Address:** ...………………………………………………………………

…………………………………………………….…………………….

…………………..……… **Pin Code-**……..…………………….

**Contact No. :** | | | | | |    | | | | | | | | | | | |

**Working Address:** ..………………………………………………………………

…………………………………………..…………………….

………………………… **Pin Code-**…………..……………….

**Contact No. :** | | | | | |    | | | | | | | | | | | |

**Email ID :** ……………………………………………………………

**Education Qualification:**

| Exam | Name of Institute | Passing Year | Marks Obtained | Marks Out of | Percentage |
|---|---|---|---|---|---|
| S.S.C. | | | | | |
| H.S.C. | | | | | |
| Basic B.Sc. Nursing /P.B.B.Sc. Nursing /P.C.B.Sc. Nursing /P.B.B.Sc. (IGNOU) Nursing | | | | | |
| First Year | | | | | |
| Second Year | | | | | |
| Third Year | | | | | |
| Final Year | | | | | |
| | | **Grand Total** | | | |

**Experience** | Y | Y | M | M | D | D | **:**

**Sector :** **DMER / DHS / PRIVATE**

**<u>Declaration by the Candidate:</u>**

1. *I hereby solemnly and sincerely affirm that each and every statement made and the entire information given by me in the application form is true and correct.*
2. *I have not concealed any material information, however if any information submitted herein is found fraudulent, incorrect or untrue, I understand that I am liable to criminal prosecution and I also agree to forgo my selection. I also understand that my selection is also liable to be cancelled.*

   *I undertake to submit all the required original certificates at the time of joining as per the rules, failing which I understand that my claim for selection shall not be granted.*

**Date : / / 2021**

**…..…………………**

**Place : …………………………** **Applicant's Sign**